श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : नुकत्याच नाशिक येथे झालेल्या झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय ज्युदो स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची खेळाडू कामिनी देविकर हिने 63 ते 70 किलो वजनगटामध्ये उल्लेखनीय कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळविला. कामिनीचे वडील श्री.पंढरीनाथ देविकर व आई सौ.सविता पंढरीनाथ देविकर ह्यांनी ज्युदो सारख्या आव्हानात्मक खेळामध्ये आपल्या मुलीला खेळण्यास प्रोत्साहित करून तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून, ग्रामीण भागातील मुलींसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री मान.बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मान. राहुलदादा जगताप, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मान. बाबासाहेब भोस, मान.महावीर पटवा, प्र. प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ.नितीन थोरात, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. रमेश थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तिला शारीरिक शिक्षण संचालिका कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक संजय डफळ व श्री.हनुमंत फंड (इंटरनॅशनल कुस्ती संकुल, श्रीगोंदा) यांचे मार्गदर्शन लाभले.

### गोविंद मुदगुरे यांच्या सौभाग्यवती काँग्रेस पक्षाकडून इच्छुक



नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : अटकळी येथील रहिवासी कांग्रेस पक्षाचे देगलूर बिलोली - विधानसभा युवक काँग्रेसचे सचिव गोविंद मुदगुरे यांच्या सुविद्य पत्नी व मागील २० ते २५ वर्षापासून सामाजिक व राजकीय चळवळीत प्रामाणिक व एकनिष्ठपणे काँग्रेस पक्षासोबत काम करणारे त्यांचे वडील मा उपसरपंच व्यंकटराव मुदगुरे यांच्या सुनबाई सौ. आनुराधा गोविंद मुदगुरे ह्या ओबीसी महिलांसाठी आरक्षीत असलेल्या अटकळी जिल्हा परिषद गटातून काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. गोविंद व्यंकटराव मुदगुरे हे काँग्रेस पक्षात सक्रियतेने काम करणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.युवक काँग्रेस मध्ये त्यांनी चांगल्या प्रकारे काम केले असून त्यांच्या कार्याची पक्षात नोंद आहे.मागील पंधरा वर्षापासून आळंदी ग्रामपंचायत येथे त्यांचे वडील पाच वर्षे उपसरपंच तर दहा वर्षे सदस्य म्हणून काम केले आहेत.काँग्रेस पक्षाचे मा तालुका अध्यक्ष तथा सरपंच संघटनेचे मा तालुका अध्यक्ष मसूद देसाई आळंदीकर यांचे ते खांदे समर्थक व विश्वासू म्हणून ओळख आहे. गोविंद मुदगुरे यांनी गावातील अनेक गोरगरीब लोकांना निराधार योजना श्रवण बाळ योजना असो अनेक योजना त्यांनी गावातील अनेक महिलांना मिळून दिली. लोकांप्रती तळमळ पूर्णवेळ लोकांसाठी कार्य करणारा कार्यकर्ता म्हणून नोंद आहे. तसेच जिल्हाचे खासदार रवींद्र चव्हाण यांचे विश्वास कार्यकर्ता म्हणून ओळख आहे. म्हणून अटकळी जिल्हा परिषद गटातून त्यांची सुविद्य पत्नी उच्चशिक्षित सौ अनुराधा गोविंद मुदगुरे यांना काँग्रेस पक्षाने संधी दिल्यास नक्कीच मतदार त्यांना प्रचंड मतांनी विजयी करतील अशी भावना अटकळी गटातील नागरिक व्यक्त करत आहेत.

# नवराष्ट्र जनसेवक पुरस्कार प्राप्त मा. अनंत महादू घाणे यांचा भव्य सत्कार

- वारंघुशी ग्रामस्थ व मा. आ. आमदार वैभव पिचड यांच्या हस्ते सत्कार

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

नवराष्ट्र जनसेवक पुरस्काराने सन्मानित झालेले जनसेवक मा. अनंत महादू घाणे यांचा वारंघुशी ग्रामस्थ व माजी आमदार वैभवभाऊ पिचड यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या प्रसंगी परिसरातील मान्यवर, ग्रामस्थ, समाजसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. वैभवभाऊ पिचड साहेब होते. यावेळी पांढरे पाटील. तुकाराम खाडे, अध्यक्ष भरतजी घाणे, सरपंच सागर रोंगटे, सुरेश गभाले, गंगाराम धिंदळे, सरपंच अनिता



कडाळी, सुनील मधे आदींनी मनोगत व्यक्त करून जनसेवक अनंत घाणे यांच्या सामाजिक कार्याचा तळगातील समाजातील गोरगरीबांची सेवा करत काम करत असल्याने गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सत्कारमूर्ती अनंत घाणे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, "हा पुरस्कार माझा नसून सर्व समाजाचा आहे. हा सन्मान मी माझ्या स्वर्गीय आई-वडिलांना व वंदनीय कै. मा. मंत्री मधुकरराव पिचड साहेब यांना समर्पित करतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. आमदार वैभवभाऊ पिचड यांच्या सहकार्याने मी समाजातील सर्व घटकांसाठी कार्य केले.

गावोगाव रस्ते, वीज, रेशन, भातपिकांची नुकसानभरपाई, रास्ता रोको, अतिवृष्टीतील पंचनामे अशा अनेक जनहिताच्या प्रश्नांवर आम्ही प्रशासकीय पातळीवर यशस्वी पाठपुरावा केला."

ते पुढे म्हणाले की, "भविष्यातही वैभवभाऊंच्या नेतृत्वाखाली जनतेच्या सेवेसाठी कार्य करत राहीन."

अध्यक्षीय भाषणात माजी आमदार वैभव पिचड यांनी अनंत घाणे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत म्हटले की, "भातपिकांचे नुकसान, रस्त्यांची दुरवस्था, रेशन वितरण, पिक विमा रस्ता रोको आदिवासी समाजात घुसखोरी यासाठी रस्त्यावर उतरत यांसारख्या सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर अनंत घाणे यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

आमचे वंदनीय कै. मधुकरराव पिचड साहेब यांनी नेहमीच शेतकऱ्यांच्या अडचणीला तात्काळ प्रतिसाद दिला, तसेच दुष्काळी काळात शेतकऱ्यांच्या खात्यात आर्थिक मदत व रेशन वितरण केले. त्या कार्याची परंपरा आम्ही घाणे साहेबांसह आजही पुढे चालवली आहे."

यावेळी वारंघुशी ग्रामस्थ व परिसरातील जनतेचे प्रश्न ऐकत सोडविण्याचे काम करत जागेवर अधिकाऱ्यांना आदेश दिले.

कार्यक्रमास उपस्थित उंबरे पाटील, एकनाथ सारुकते, तुकाराम सारुकते, हनुमंत मुळे, अमृता झडे, सिताराम खाडे, सयाजी असवले. उघडे सर, नामदेव बांडे. मारुती बांडे.

कुंडली घारे . सरपंच फसाबाई बांडे. पंढरीनाथ खाडगीर, आलकाबाई घाणे, कमल घाणे, चेअरमन कृष्णा कडाळी, प्रकाश कोरडे, दिपक भागडे. दिलीप भागडे. तुकाराम लांडगे. मारुती खाडे, चिंधु घाणे, रामजी आढार. तुकाराम कडाळी. हरिश्चंद्र घाणे. दादाभाऊ लोटे. यादव कडाळी. जालिंदर भागडे. नामदेव घाणे. ग्रामविकास अधिकारी गभाले. वसंत घाणे. चेअरमन भवारी साहेब.संभाजी लांडगे. जाखेरे सर. राजु भवारी. विठ्ठल भवारी.

सुनील पवार सह परिसरातील अनेक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुन्नर तालुका प्रारूप मतदारयादीवर १२०० हरकती

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगर परिषदेची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर शुक्रवार ता:-१७ ऑक्टोबर पर्यंत एकूण एक हजार २२७ हरकती दाखल झाल्या आहेत. निवडणूक आयोगाने हरकती दाखल करण्या साठी मुदतवाढ दिल्याने हरकतींची संख्या दुप्पटझाली आहे. नगर परिषदेच्या मतदार यादीत प्रामुख्याने एका प्रभागा तून दुसऱ्या प्रभागात नाव समाविष्ट झाल्याच्या हरकती अधिक असल्याचे सांगण्यात आले मतदारांनी केलेल्या हरकतींची छाननी करण्याचे काम सुरू असल्याचे मुख्याधिकारी चरण कोल्हे व निवडणूक विभाग प्रमुख बाळासाहेब भोसले यांनी सांगितले. राज्य निवडणूक आयोगाने सुरवातीला प्रारूप मतदार यादीवर हरकती घेण्या साठी सोमवारी ता:-१३ ऑक्टो बर अंतिम मुदत दिली होती. या कालावधीत एकूण ६३५ हरकती दाखल झाल्या होत्या.प्रारूप मतदार यादीबाबत मतदारांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्याने निवडणूक आयोगाने सुधारित कार्यक्रम जाहीर केला होता त्या नुसार हरकती दाखल करण्यास मुदतवाढ मिळाली होती मतदारां नी केलेल्या हरकती बाबत शहानिशा करून त्यानंतर आवश्यक तो बदल यादीत करता येईल.

# दीपावलीच्या पार्श्वभूमीवर विनय नगर येथे सांज सुरेल गीतांचा मैफिल संपन्न

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग २३ चे भाजप चे माजी नगरसेवक यशवंत निकुळे , माजी नगरसेविका रुपाली निकुळे व विनय नगर ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या वतीने दीपावली सांच मैफिलीचे आयोजन जयप्रकाश छाजेड उद्यानामध्ये रविवारी (दि१९) सायंकाळी आले होते. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक ज्ञानेश्वर मेश्राम (माऊली), पार्श्वगायिका कुमारी खुशी भोजक यांनी कानडा राजा पंढरीचा, चला जेजुरीला जाऊ, कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी, राधा ही बावरी आदी सुप्रसिद्ध भक्तीगीते भजन, हिंदी, मराठी गीते सादर करत रसिक श्रोत्यांची मने जिंकली. त्यांना गायक अर्जुन तांबे, गायिका मिनल



धोडपकर, कीबोर्ड अनिल धुमाळ, तबला महेश धोडपकर, ऑक्टोपॅड देवानंद पाटील, प्रतीक पाटील यांनी साथ दिली. तर उत्कृष्ट असे सूत्रसंचालन सचिन जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मध्य विधानसभेच्या आमदार प्राध्यापक देवयानी फरांदे हया उपस्थित होत्या.

या ठिकाणी सुसज्ज असे उद्यान उभारले गेले आहे. त्यातच आज पहिल्यांदाच दीपावलीच्या सुरुवातीच्या पूर्वसंध्येला सुरेख अशा सांज मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे . अशाच प्रकारची सांज मैफल दरवर्षी या उद्यानामध्ये सुरूच रहावी ही सदिच्छा देते. कार्यक्रमाचे आयोजन करणारे माजी नगरसेवक यशवंत व रुपाली निकुळे यांनी छान प्रकारे कार्यक्रमाचे आयोजन केल्याने त्यांचे आभार मानते आपण सर्वांनी त्यांना पुन्हा एकदा नगरसेवक म्हणून येथून निवडून द्यायचे आहे. आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा असे फरांदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष सुनील केदार, सुनील फरांदे, माजी महापौर सतीश कुलकर्णी, माजी नगरसेवक चंद्रकांत खोडे, संदीप लेंडकर, ऍड श्याम बडोदे, अर्चना थोरात, शाहीन मिर्झा, दिपाली कुलकर्णी, सुप्रिया खोडे, योगेश म्हस्के, सुनील खोडे आदी सह विविध क्षेत्रातील मान्यवर ज्येष्ठ नागरिक, महिला , पुरुष , लहान थोर सर्वजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडज येथील ऑक्सिजन पार्कमध्ये दिपोत्सव साजरा

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर हा सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक,आर्थिक दृष्टीने खूपच अग्रेसर आहे त्यातच पर्यटन तालुका म्हणून देखील प्रसिद्ध आहे या तालुक्यात किल्ले,दुर्ग,गड त्याच बरोबर ऐतिहासिक प्राचीन लेणी यांचे माहेरघर आहेच मात्र सद्या जुन्नर तालुक्यातील पर्यावरण संरक्षण करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था वृक्षारोपण आणि लावलेल्या झाडांचे पालन पोषण करित असूनतालुक्यातील वडज गावातील ऑक्सिजन



पार्क हे त्याचेच एक उदाहरण आणि इतरांना प्रेरणा देणारे बाग आहे. याच वडज येथील ऑक्सिजन पार्कमध्ये ४०० पाण्याचे दिवे लाऊन रात्री पर्यावरण पुरक दिपोत्सव साजरा करण्यात आल्याची माहिती ऑक्सिजन पार्कचे निर्माते, माजी सैनिक,राष्ट्रपती पुरस्कार विजेते आणि सद्या जुन्नर वनविभागात वनरक्षक म्हणून कार्यरत असलेले रमेश खरमाळे यांनी दिली.पर्यावरणाचे महत्त्व घरोघरी पोहचवणे हा मुख्य उद्देश दिपोत्सवातुन देण्यात आला खरेतर जन्माला आल्यापासून शेवटच्या श्वासापर्यंत पर्यावरणा तील झाडे व जैवविविधता मानवाची जीवन ज्योत तेवत ठेवण्याचे महान कार्य करत असते त्यांच्या प्रती कृतज्ञता व जागृकता निर्माण व्हावी हेच ध्येय आमचे आहे. ऑक्सिजन पार्क दिपोत्सवानी उजळून निघाला होता.ऑक्सिजन पार्क वडज या दरम्यान ४०० पाण्याचे दिवे सह्याद्री वाईल्ड लाईफ ट्रेकर्सच्या माध्यमातून लावण्यात आले.

# पुरातत्व वारसा प्रतिबंध क्षेत्रात अतिक्रमण; गुन्हा दाखल

**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

इतिहास प्रसिद्ध आणि पुरातत्व खात्यात अनन्यसाधारण महत्व असलेल्या घाटघर ता:- जुन्नर नाणेघाट लेण्याच्याप्रतिबंध क्षेत्राच्या हद्दीत बांधकाम करणाऱ्या दोन व्यक्तींच्या विरोधात प्राचीन स्मारके व पुराणजागा व अवशेष अधिनियम १९५५ चे कलम २० व ३० (ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती जुन्नर पोलीस स्टेशन चे पोलिस निरीक्षक किरण अवचर यांनी दिली. यमुनाबाई किसन रावते रा:- घाटघर,ता:-जुन्नर,व गणेश बबन सांगडे रा:-धालेवाडी तर्फे मिन्हेर ता. जुन्नर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.तर पुरातत्त्व विभागा चे कर्मचारी अभिषेक कुमार व राजकुमार पाल यांनी फिर्याद दिली आहे.यातील आरोपी गणेश सांगडे याच्या विरोधात यापूर्वी जुन्नर पोलिस स्टेशनमध्ये अनेक वेगवेगळे चार गुन्हे दाखल आहेत त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

# "वर्ल्ड सामना"ने महाराष्ट्राची वाङ्:मयीन संस्कृती जोपासली : ना. मुरलीधर मोहोळ

## पुण्यात "वर्ल्ड सामना" दिवाळी अंकाचा मोठ्या दिमाखात प्रकाशन सोहळा संपन्न

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राला दिवाळी अंकाची वैभवशाली परंपरा असून त्या परंपरेतील "वर्ल्ड सामना" चा दिवाळी अंक वाचकांची अभिरूची लक्षात घेऊन वाङःमयीन मेजवानी देणारा दर्जेदार अंक आहे. साहित्याच्या सर्वांगाला न्याय देण्यासाठी, वाचकांना दिवाळीचा आनंद आणि दर्जेदार साहित्याचा आस्वाद मिळवून देण्यासाठी कुलथे परिवाराने घेतलेले परिश्रम यामध्ये दिसून येतात. श्रीरामपूर सारख्या ग्रामीण भागातून एवढा दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित होतो हे खरे वाटत नाही. वर्ल्ड सामनाने महाराष्ट्राची



वाङ्:मयीन संस्कृती जोपासत २०२५ च्या "वर्ल्ड सामना" दिवाळी अंकाचे प्रकाशन करून माझाही आनंद द्विगुणित केला आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय सहकार व नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांनी काढले.

पुणे येथे "वर्ल्ड सामना" या दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर, उद्योजक प्रसाद सोनार, श्री. वायंदेशकर, पराग सोनार आदि उपस्थित होते.

यावेळी ना.मोहोळ म्हणाले, वर्ल्ड सामना दिवाळी अंकाने गेल्या ३४ वर्षापासून मराठी भाषेला साजेसे काम केले आहे. दिवाळी या सणाची लोक आतुरतेने वाट पाहत असतात. तितक्याच किंबहुना त्याहून अधिक आतुरतेने वाचक त्यांच्या आवडत्या दिवाळी अंकाची वाट पाहू लागले आहेत. दिवाळी अंक जसे वाचकप्रिय होत होते ते लेखकप्रिय होत होते. कारण अशा लेखकांना आणि विशेष करून ज्या लेखकांना स्वतःची पुस्तके प्रकाशित करणे शक्य नव्हते त्या लेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याची नामी संधी वर्ल्ड सामना दिवाळी अंकाने प्राप्त करून दिली. अनेक दिग्गज लेखक, कवींचे कथा आणि कविता या दिवाळी अंकांमधूनच साकारले गेले. या दिवाळी अंकांनी अनेक लेखक कवींना ओळख मिळवून दिले आहे. मराठी भाषेला समृद्ध करण्यात वर्ल्ड सामना दिवाळी अंकाचे मोठे योगदान आहे.

प्रमुख पाहुणे कविटकर म्हणाले, दिवाळीत लावले जाणारे दिवे, पणत्या जसे घर अंगण प्रकाशित करतात तसाच दिवाळीत प्रकाशित होणारा वर्ल्ड सामना दिवाळी अंक वाचकांचे आयुष्य प्रकाशमान करतो, या दिवाळी अंकामध्ये असणारे लेखकांचे लेख, कथा आणि कविता, व्यंगचित्रे, चारोळ्या दिवाळीत खाल्ल्या जाणाऱ्या चविष्ट फराळा सारख्याच आहेत. कारण ते लेख, कथा, कविता हे सर्व प्रकारचे साहित्य, वाचक म्हणून आपली बौद्धिक भूकही भागवत असतात. आपल्या देशात दिवाळीची परंपरा फार जुनी आणि समृद्ध आहे. तशीच आपल्या देशातील दिवाळी अंकांनाही समृद्ध अशी परंपरा आहे मराठी भाषेतील दिवाळी अंक ही त्याच समृद्ध परंपरेचा एक भाग आहे.

कार्यकारी संपादक स्वामीराज कुलथे यांनी, मराठी भाषेच्या प्रवासात दिवाळी अंकांची भूमिका खूप मोठी राहिली आहे. वर्ल्ड सामना दिवाळी अंकाने लेखक आणि वाचकांच्या वाटा उजळून टाकल्या आहेत.

शंभरहून अधिक वर्षं सुरू असलेल्या मराठी दिवाळी अंकांच्या परंपरेचा गेल्या ३४ वर्षापासून दिवाळी या सणाच्या निमित्ताने दिवाळीतील एका महत्त्वाच्या घटकाचा आढावा घेण्याचा छोटासा प्रयत्न आम्ही करत आहोत असे सांगत आभार मानले.

# एकल महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मोफत चष्मे व साड्या वाटप

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथे डिसेंट फाउंडेशन पुणे ,पंचायत समिती आरोग्य व महसूल विभाग जुन्नर ,श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र व महाराष्ट्र ग्रुप जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने एकल महिला सशक्तीकरण अभियान संपन्न झाले .या शिबिरात ५८७ एकल महिलांच्या ॲनिमिया ,रक्तदाब ,मधुमेह व रक्तातील विविध तपासण्या ,नेत्र तपासणी ,ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी ,दंत तपासणी ,मोफत २०० चष्मे वाटप ,आयुष्यमान भारत ,वय वंदना नावनोंदणी ,संजय गांधी निराधार योजना व जात प्रमाणपत्र अशा



विविध आरोग्य तपासण्या व सरकारी योजनांचा लाभ महिलांनी घेतला . तसेच गरीब व गरजू महिलांना साड्या व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले .

या अभियानासाठी डोके हॉस्पिटल नारायणगाव ,माऊली ॲप्टिकल आय केअर सेंटर जुन्नर ,विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नारायणगाव ,हिंद महा लॅब जुन्नर ,श्रीकृष्ण दातांचा दवाखाना जुन्नर यांचे सहकार्य लाभले .

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ .अश्विनी कुळमेथे ,डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ .एफ .बी .आतार ,डॉ .दयानंद गायकवाड ,संतोष आटोळे ,तपासणी तज्ञ सपना बेलवटे ,संचालक आदिनाथ चव्हाण ,प्रयोगशाळा समन्वयक मंगेश साळवे ,श्री राधेश्याम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक चव्हाण ,रजनी शहा ,नेत्रतज्ञ विलास बोंद्रे ,डॉ .ज्ञानेश्वर गायकवाड ,चैत्राली केंगले ,अरुण शेरकर ,सागर पवार ,सुनील जंगम ,शमीम सय्यद ,राहुल मुसळे ,अध्यक्ष सुनील परदेशी ,नफिसा इनामदार ,ई सेवा केंद्राचे प्रतिनिधी ,आरोग्य मित्र ,आशा सेविका व महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता .



ठाणे : दिव्यातील तलाव येथे श्री छत्रपती शंभु राजे संघटना आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रसंगी एक दिवा राष्ट्रासाठी, देशासाठी जिजाऊ मा साहेबांसाठी, छत्रपती शिवरायांसाठी, छत्रपती शंभू राज्यांसाठी, सिमेवर लढणाऱ्या जवानांसाठी, आपल्या आई-वडिलांसाठी, कोरोना काळात प्राण गमावलेल्या बांधवांसाठी अनेक दिवा वासियांनी या दीपावली पहाट मध्ये सामील होऊन प्रत्येकांनी एक दिवा प्रज्वलीत करून या दिवाळी पहाटचा आनंद द्विगुणीत करून दिपोत्सव साजरा केला.

## थोडक्यात बातम्या...

### अध्यक्ष पदी वामनराव पाटील तर शहराध्यक्षपदी अमोल धुमाळे



**हिमायतनगर (स. गांवकरी) :** हिमायतनगर तालूका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजितदादा पवार गट तालूकाध्यक्ष पदी वामनराव पाटील वडगावकर यांची निवड करण्यात आली आहे. तर शहराध्यक्षपदी अमोल पाटील धुमाळे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीचे पत्र दोघांनाही नूकतेच प्राप्त झाले आहे. वामनराव पाटील वडगावकर यांनी अल्पावधीतच पक्ष संघटनेत वेगाने काम करूण वरिष्ठांचा विश्वास संपादन केला आहे. त्यांना राष्ट्रवादीच्या तालूकाध्यक्ष पदाची संधी देण्यात आली असून, ऐन नगरपंचायत व जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हि निवड महत्वपूर्ण मानली जात आहे. माजी तालुकाध्यक्ष अभिषेक लूटे यांना वरिष्ठ पदांवर बढती देण्यात आली असून जिल्हा कमेटीवर त्यांना महत्वाची जबाबदारी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. वामनराव पाटील व अमोल धुमाळे यांच्या या निवडीबद्दल त्यांच्या मित्र परिवारांतून अभिनंदन केले जात आहे.

### आधार कार्ड मतदान कार्डला का जोडले नाही : जुन्नर तालुक्यात जोरदार चर्चा

**शिवनेरी (स. गांवकरी) :** केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने आधार कार्ड मतदान कार्ड ला ( लिंक ) का ? जोडले नाही. याबाबत जुन्नर तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. तालुक्यातील नागरिकांना बँक, पोस्ट ऑफिस, पंचायत समिती, जिल्हा परिषद, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, अल्पभूधारक व बेरोजगारांना, शासकीय कामगार, शासनाच्या व केंद्र सरकारच्या सर्व विविध योजनेच्या संदर्भात संबंधित अधिकारी विचारतात या वर्षी आधार कार्ड - पॅन कार्डला जोडले आहे का ? यासाठी नागरिक प्रत्येक योजनांचा फायदा घेण्यासाठी लिंक करणे गरजेचे असते. बँकेमध्ये व्यवहाराच्या संदर्भात गेले असता आधार कार्ड - बँक अकाऊंटला जोडले याबाबत विचारणा होत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महाविद्यालय व आश्रम शाळेमध्ये शिक्षक परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थी पालकांना विचारतात आधार कार्ड -शालांत परीक्षा जोडून घ्या असे सांगतात. नागरिकांनी आधार कार्ड - गॅस सिलेंडर, मोबाईल, नोकरी, सरकारी योजनांचा फायदा घेण्या साठी जोडणे आवश्यक आहे असे वारंवार सांगितले जाते. पण आधार कार्ड मतदान कार्डाला ( लिंक ) का ? जोडले नाही . याबाबत तालुक्यात नागरिकांकडून उलट सुलट चर्चेमध्ये असे समजले की, आधारच्या लिंकींगमुळे एकाच नांवाने वेगवेगळ्या ठिकाणचे डबल / ट्रीपल मतदान बंद होईल. एकाच व्यक्तीचे दोन वेगवेगळ्या नांवाने होणारे मतदान बाद होणार. तसेच बोगस नांवाने मिळवली जाणारी मते बाद होणार आहे. अशी चर्चा सुरू आहे.

### ट्रॅक्टर चालकाने वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे एक जण पूर्ण फॅक्चर

**शिवनेरी (स. गांवकरी) :** जुन्नर तालुक्यातील पश्चिम आदिवासी भाग, दार्याघाट , जुन्नर एसटी स्टँड, बाजार समिती, महाविद्यालय, आश्रम शाळा , जुना जकात नाका व परिसरात वाहतुकीच्या नियमाबाबत सदैव संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असल्यामुळे वारंवार अपघात पहावयास मिळत आहे. याबाबत तहसीलदार डॉक्टर सुनील शेळके उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील व पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी वाहतुकीच्या संदर्भात कडक मोहीम राबवणे अशी चर्चा ज्येष्ठ नागरिक , पालक वर्ग व शेतकऱ्यांमध्ये सुरू आहे . जुन्नर पोलीस स्टेशन येथे दादाभाऊ बबन उंडे वय ५० वर्षे रा. उसरान यांनी फिर्याद दिली कि, खडकुंबे जाणाऱ्या रोडवर रोहिदास कोंडीभाऊ गारे यांनी सांय. ६:१५ वा. त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर उसराण बाजूकडे स्वतः चालवीत जात असताना यावेळी हाईगईने ,अविचाराने व निष्काळपणे रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले . या ठिकाणी समोरून येणाऱ्या होंडाशाईन मोटरसायकल क्रमांक एम एच १४ जे एम १६५८ लाख जोरात धडक मारून अपघात केला. मोटरसायकल चालक महेंद्र दादा उंडे यांच्या तोंडास मार लागून तोंडाचा जबडा, उजवा हातला दुखापत झाली.

# विकासकामांचा आढावा सादर करून पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र विशे यांचा ठरल्याप्रमाणे राजीनामा

## २८ विकासकामांची माहिती पत्रकार परिषदेत जाहीर; नागरिकांचे आभार व्यक्त करत शांतपणे पदत्याग

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

गाव हा देशाच्या विकासातील पाया असून गावाच्या प्रगतीमुळेच देशाची उन्नती शक्य होते, असे मानले जाते. गावाच्या सर्वांगीण विकासात सरपंच आणि ग्रामपंचायत यांची भूमिका अत्यंत महत्वाची असते. भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र विशे यांनी त्यांच्या कार्यकाळातील २८ महत्वाचे विकासकामे पत्रकार परिषदेत सविस्तर जाहीर केली. रविंद्र विशे यांनी नुकताच सरपंच पदाचा ठरल्याप्रमाणे राजीनामा दिला आहे. या प्रसंगी त्यांनी आपल्या कार्यकाळातील विविध विकासकामांचा आढावा मांडला आणि नागरिकांचे सहकार्य आणि



विश्वासा- बद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. कार्यकाळातील प्रमुख विकासकामांमध्ये शाळा, रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि समाजोपयोगी प्रकल्पांचा समावेश आहे. त्यात जिल्हा परिषद पडघा शाळेची संरक्षण भिंत, स्टेज, पत्राशेड आणि शौचालय बांधणे; शारदा विद्यालय पडघे येथे पेव्हर ब्लॉक रस्ता आणि ध्वजस्तंभ; पडघा-भादाणे रोडवर बैठक हॉल व पेव्हर ब्लॉक रस्ता; संत रोहिदास नगरातील मागासवर्गीय निधीतून समाजोपयोगी भांडी वाटप; अपंगांसाठी आर्थिक सहाय्य निधी वितरण; वेताळ पाडा येथे पेव्हर ब्लॉक रस्ता; स्वामी विवेकानंद वाचनालय शौचालय बांधणी; पोलीस स्टेशन रोड रुंदीकरण व गटारबांधणी; गणेश नगर नवीन स्मशानभूमी; अचानक नगर पेव्हर ब्लॉक रस्ता; गावात विविध ठिकाणी खुर्ची व बाकडे वाटप; वातानुकूलित शववाहिनीची उपलब्धता; संत तुकाराम महाराज मंदिर पडघा येथे पाण्यासाठी बोअरवेल; आणि पंचशील नगर प्रवेशद्वार बांधकामास लवकरच सुरूवात होणार आहे. रविंद्र विशे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, "माझा राजीनामा मी ठरल्याप्रमाणे दिला असून, नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. गावाच्या विकासासाठी केलेले सर्व काम माझ्या आयुष्यातील अभिमानाचे क्षण आहेत." या कार्यक्रमाला पंचायत अधिकारी भास्कर घुडे, उपसरपंच अलका मोरे, ग्रामपंचायत सदस्य शैलेश बिडवी, अभिषेक नागावेकर, प्रभावती जाधव, चंदा साळुंखे, निता दास, नयना जाधव, मयुरेश गंधे, सायली पाटील, माजी सरपंच संजय जाधव, माजी उपसरपंच गुरुनाथ मोरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले. पडघा ग्रामपंचायतमध्ये सरपंच पदाचा राजीनामा देऊन रविंद्र विशे यांनी आपल्या कार्यकाळातील सर्व प्रकल्पांचा यशस्वी आढावा जाहीर करून गावकऱ्यांसमोर आपली जबाबदारी पूर्ण केली आहे.

# अतिवृष्टीग्रस्त कर्जत - जामखेडमधील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**

माहे सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे कर्जत-जामखेडसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांचे पिके वाहून गेली, बंधारे तुटले, घरांचे नुकसान झाले, आणि हजारो हेक्टर क्षेत्रातील उभे पीक पूर्णतः नष्ट झालेले होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देणारा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील ८ लाख २७ हजार ११८ शेतकऱ्यांना एकूण ८४६ कोटी ९६ लाख रुपयांचे अनुदान जाहीर करण्यात आलेले आहे. शासनाने महसूल आणि कृषी विभागाला ही मदत दिवाळीपूर्वी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या निर्णयाचा मोठा लाभ अहिल्यानगर जिल्ह्यासह कर्जत-जामखेड मतदारसंघातील शेतकऱ्यांनाही मिळणार असून, कर्जत -जामखेडसाठी शासनाने एकूण १५८ कोटी ३१ लाख रुपयांचे भरीव अनुदान मंजूर झालेले आहे. अशी माहिती महाराष्ट्र विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिली.

# कळसेश्वर देवस्थानात भक्तांसाठी एन.के.टी. ग्रुपतर्फे सतरंजी प्रदान

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते वितरण!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या कळसेश्वर देवस्थान येथे भाविक भक्तांसाठी बसण्याची व्यवस्था म्हणून एन.के.टी. ग्रुप तर्फे सतरंज्या प्रदान करण्यात आल्या. या सामाजिक उपक्रमाचे वितरण महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख भाऊसाहेब



वाकचौरे पाटील, तालुकाध्यक्ष अशोक उगले, तालुका सचिव हरिभाऊ फापाळे, सुनील आरोटे तसेच स्थानिक कार्यकर्ते आणि भाविक उपस्थित होते.

एन.के.टी. ग्रुप तर्फे सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवले जात असून, धार्मिक तसेच सामाजिक क्षेत्रातही संस्थेचे योगदान लक्षणीय आहे. कळसेश्वर देवस्थान परिसरात भक्तांना सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला आहे.

या प्रसंगी डॉ. आरोटे यांनी सांगितले की, "देवस्थान ही श्रद्धेची केंद्रे आहेत; परंतु ती अधिक सेवा-आधारित व्हावीत यासाठी अशा छोट्या पण महत्त्वाच्या सुविधा भक्तांना दिल्या जाणे आवश्यक आहे. एन.के.टी. ग्रुपने केलेले हे कार्य नक्कीच प्रेरणादायी आहे."

# शिक्षक हेच जीवनाचे शिल्पकार; विद्यार्थ्यांनी आज्ञाधारक राहावे : डॉ. विश्वासराव आरोटे

- **जय भवानी माता विद्यालयात शालेय साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न!**

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील जय भवानी माता विद्यालयात आयोजित शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,



"शिक्षक हे आपल्या जीवनाचे खरे शिल्पकार आहेत. विद्यार्थ्यांनी नेहमीच शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करावे. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे कोणीतरी गुरु असतोच. शिक्षक लाखो विद्यार्थ्यांना घडवतात, आणि प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वप्न काय आहे हे त्यांना उत्तम प्रकारे ठाऊक असते."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा सौ. किशोरीताई जाधव होत्या. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. लांडगे पी.वाय., श्री. बेद्रे पी.ए., श्री. जाधव आर.ए., श्री. राहणे सर, श्री. जाधव एन.एल., श्री. पोखरकर बी.डी., श्री. सातपुते व्ही. एल., कलाशिक्षक श्री. बोंबले आर.एन., पांढरे विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय उकिरडे, मधुकर पिचड विद्यालय, पाडोशीचे मुख्याध्यापक जाधव सर आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी मास्टर स्ट्रोक नवनीत राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेतील विजेते विद्यार्थी — गंभीरे सत्यजित विजय (राज्यस्तरीय निवड) देशमुख गणेश रोहिदास (राज्यस्तरीय निवड) यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. विश्वासराव आरोटे पुढे म्हणाले, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण हे शहरी भागातील लाखो रुपये खर्चून घेतल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षा अधिक मौल्यवान आहे. येथे प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये यश दडलेले आहे — ते शोधून काढणे हे शिक्षकांचे काम आहे. आपण ज्या शाळेत शिकलो ती शाळा विसरू नका. भविष्यात यशस्वी झाल्यानंतर दानधर्म करताना मंदिरापेक्षा या ज्ञानमंदिरात — जिथे सरस्वती, लक्ष्मी, तुकोबा, विठोबा यांसारखे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत — येथे खर्च करणे हेच खरे यशस्वी दानधर्म होईल."

# मोडाळे गावचा अभिमान लोकसेवेसाठी समर्पित व्यक्तिमत्व

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

गेली १५ वर्षापासून सर्व जाती धर्मातील वंचित, उपेक्षित , महिला आणि विद्यार्थ्यांसाठी काम करणारा युवा अवलिया कार्यकर्ता म्हणून प्रसिद्ध असलेला राहुल बोंबले यांचा आदर्श वाखान्याजोगा आहे. तालुक्यातील युवकांसाठी

आदिवासी समाजात्ताठी खावटी बाटप योजना राबवून त्यांना त्यात्चा लाभ मिळवून देण्याचं काम केल आहे.

स्वाधार योजना, CMEGP/ PMEGP योजना, आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृह योजना, छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजना, परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी योजना,



तृतीयपंथीयांसाठी कल्याणकारी योजना, गटाई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरवणे योजना, वसंतराव नाईक महामंडळ योजना, अण्णाभाऊ साठे महामंडळातील विविध योजना, महाज्योती विभागाच्या विविध योजना, एकल पालक योजना, लाडकी बहीण योजना, अपंग कल्याणकारी योजना, वृद्धांसाठी वयोश्री योजना व तीर्थ दर्शन यात्रा योजना ,संजय गांधी पेन्शन योजना, वृध्दपकाल पेन्शन योजना, निराधार पेन्शन योजना अशा वेगवेगळ्या योजना वृध्द, विधवा महिला, परित्यक्त महिला, अपंग व्यक्तिंना या योजनांचा लाभ मिळवुन दिला आणि याचा सर्व अनुभव आपल्या जनतेने घेतलेला आहे अण्णासाहेब पाटील कर्ज योजना, विद्यार्थ्यांसाठी जात पडताळणीसाठी मार्गदर्शन व मदत.

महिलांना बचत गटाव्दारे किंवा इतर सरकारी योजनांचा लाभ मिळावा याकरिता त्या महिलांचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये खाते उघडून दिले. गांवकरी तसेच गावातील युवक मंडळ यांच्या सहकार्याने वृक्षरोपन केले व ती वृक्ष जगवली देखील. दारिद्रयरेषेखालील सर्व लोकांकरिता शिधापत्रिका मिळवुन देण्यासाठी सर्वोतपरी सहाय्य केले.

आदिवासी विकास महामंडळ, शबरी महामंडळ, पंचायत समित्ती, समाजकल्याण विभाग इत्यादीच्या अंतर्गत चालणाऱ्या योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम मी माझ्यामार्फत केले. समाज प्रबोधनाच्या माध्यमातुन छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतेचे विचार लोकांपर्यंत, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम केले. अंधश्रध्दा निर्मुलनाच्या माध्यमातुन प्रयोगाव्दारे समाज प्रबोधनाचे कार्य केले. २०१२ बाललैंगिक प्रतिबंधक कायदा प्रत्येक शाळा/महाविद्यालांमध्ये जाऊन विद्यार्थी व पालकांचे प्रबोधन करून जनजागृती करण्याचे काम केले आहे.

स्त्री सक्षमीकरण व स्त्री सबलीकरण करण्यासाठी प्रबोधन कार्यशाळा आयोजित केली. संविधानातील स्त्री-पुरुष समानता, न्याय, समता व बंधुता ही मुल्य समाजामध्ये रुजावी यासाठी संविधान जनजागृती प्रबोधन, संविधान प्रास्ताविक वाचन व संविधान प्रत वाटप यांसारखे उपक्रम राबविले. ईगतपुरी तालुक्यातील ६५ ग्रामपंचायतींना बार्टी या स्वायत्त संस्थेमार्फत मोफत प्रत्येकी १० हजाराची पुस्तके मिळवून देण्यात आली. समाजातील उपेक्षित घटकांकरिता केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या एकदिवसीय कार्यशाळेचे घोटी या ठिकाणी सर्वप्रथम आयोजन करून हा कायदा समजावुन सांगितला. यासाठी मोठ्या प्रमाणावर ईगतपुरी तालुक्यातील सरपंच, ग्रामस्थ विविध शाळेतील शिक्षक-विद्यार्थी उपस्थित होते. बेरोजगारांचा कौशल्य विकास झाला तरच देशाची प्रगती या संकल्पनेतुन नाशिक येथे तालुकास्तरीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पथनाटयाव्दारे शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत, ग्रामीण परिसरात अंधश्रध्दा निर्मुलन, शिक्षणाचे महत्व, स्त्री-पुरुष समानता जातीय निर्मुलन, भ्रष्टाचार इत्यादी विषयांवर प्रबोधनाचे कार्य करण्यात आले. आर.टी.ई. च्या अंतर्गत गरीब मुलांना इंग्रजी शाळेत प्रवेश मिळवुन दिला.

खंबाळे गटातील माझ्या बंधू आणि भगिनींनो सप्रेम सविनय नमस्कार, मी राहुल राधाकिसन बोंबले सर्वप्रथम एक कळकळीची विनंती करतो की पत्र पूर्ण वाचा या पत्रात आश्वासने नाहीत स्वार्थासाठी केलेली मखलाशी नाही स्वतःविषयीची खोटी माहिती नाही अहंकार नाही गर्वाने केलेली विधाने नाहीत आणि मतांचा जोगवा मागण्याची लाचारीही नाही हे पत्र म्हणजे माझ्या कर्तुत्वावर प्रेम करणाऱ्या आपल्यासारख्या सर्व प्रियजनांना लावलेला कौल आहे. आजोबा,आई-वडील, यांच्या शिकवणीतून जडणघडणीतून फक्त एकच गोष्ट रक्तात भिंतली ती म्हणजे मेहनत इमानदारी आणि शक्य होईल तितकी समाज सेवा करणे राहुल बोंबले यांचे आजोबा लक्ष्मण कृष्णाजी बोंबले हे तीन वेळा जिल्हा परिषद सदस्य तसेच राजकारणाबरोबर सामाजिक कामांमध्ये नेहमी पुढे त्यांचेच एक उदाहरण म्हणजे 1972 सालचा भात लढा सर्वसामान्यांसाठी निस्वार्थपणे केलेल्या कार्यासाठी त्यांची एक प्रभावी ओळख यांच्या शिकवणीतून जडणघडणीतून फक्त एकच गोष्ट रक्तात भिंतली ती म्हणजे मेहनत इमानदारी आणि शक्य होईल तितकी समाज सेवा करणे. त्याप्रमाने राधाकिसन लक्ष्मणराव बोंबले हे आदिवासी महामंडळामध्ये कार्यरत असताना समाजातील तळागाळातील पिढीत उपेक्षित कुपोषित लोकांना त्यांनी खावटी वाटप, मोटार पंप वाटप इत्यादी सारख्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ देऊन नेहमीच समाजातील गोरगरिबांना प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला.

बोंबले यांच्या आई सौ मंगला राधाकिसन बोंबले या आदर्श मोडाळे गावाच्या माजी सरपंच होत्या व त्यांनी त्यांच्या कारकीर्द मध्ये राज्य व केंद्र शासनाचा पुरस्कार गावासाठी मिळवला.

## आदिवासी भागात आजही दिवाळीला तेल मागण्यांची परंपरा

**एकदरे : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात आजही दिवाळी म्हणेच आपल्या कुलदैवतांसाठी तेल मागण्यांची परंपरा तेथील तरुण युवकांनी जपून ठेवली आहे.दिवाळी म्हणजे प्रकाशाचा,आनंदाचा सण.

अश्विन महिन्यातील शेवटचे तीन दिवस आणि कार्तिक महिन्यातील पहिले दोन दिवस असा पाच दिवसांचा दिवाळीचा हा सण असतो.शरद ऋतुच्या मध्यभागी येणारा हा दीपोत्सव काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत सर्वत्र उत्साहाने साजरा केला



जातो.दिवाळीच्या आधीपासूनच फराळाचे पदार्थ करण्याचे काम सुरू होते.आश्विन शुद्ध द्वादशीला वसुबारसही साजरी करतात. वसुबारसेच्या सायंकाळी गाईची पूजा करतात.त्यादिवसापासून गावातील मुले सर्व एकत्र येऊन गवताच्या काड्यांची नागफनई करून त्यात पंती ठेऊन गावातून आदिवासी रूढी परंपरेतील गाणे म्हणत प्रत्येक घरी जाऊन तेल मागतात.असे पाच दिवस सगळे एकत्र येऊन अनोख्या पद्धतीने दिवाळी सण साजरा करतात. हे तेल जमा करून आपल्या कुलदैवतांतील देवासाठी वाहतात.

ही परंपरा आजही आदिवासी भागात टिकून ठेवण्याचे काम गावातील काही तरुण पीढीतील मांगी तुंगी ग्रुपचे सचिव नवनाथ भांगरे,तसेच राजू भांगरे,यांच्या मार्गदर्शनाखाली आर्यन भांगरे,अनिल भांगरे,करण भांगरे,अर्जुन भांगरे,करण आढळ,बाबू भांगरे,सार्थक भांगरे,निखिल भांगरे यांनी ठेवली आहे.या परंपरेचे सर्वत्र चांगलेच कौतूक होत आहे.



ठाणे : दिव्यातील दातीवली तलाव येथे श्री छत्रपती शंभु राजे संघटना आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रसंगी एक दिवा राष्ट्रासाठी, देशासाठी जिजाऊ मा साहेबांसाठी, छत्रपती शिवरायांसाठी, छत्रपती शंभू राज्यांसाठी, सिमेवर लढणाऱ्या जवानांसाठी, आपल्या आई-वडिलांसाठी, कोरोना काळात प्राण गमावलेल्या बांधवांसाठी अनेक दिवा वासियांनी या दीपावली पहाट मध्ये सामील होऊन प्रत्येकांनी एक दिवा प्रज्वलीत करून या दिवाळी पहाटचा आनंद द्विगुणीत करून दिपोत्सव साजरा केला तसेच प्रसंगी सुश्राव्य संगीत भजन सादर करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना विभागप्रमुख व शंभूराजे संघटनेचे राजेश पाटील यांनी आयोजन केले होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### वारंघुशी येथे ग्रामस्थांनी तलाठी कार्यालयाला ठोकले टाळे

■ अतिवृष्टी झाली पंचनामे करण्याचे आवाहन

**एकदरे (स. गांवकरी) :** अकोले तालुक्यातील वारंघुशी येथे विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.या विशेष ग्रामसभेत ग्रामस्थानी तलाठी रामदास पिचड यांच्या विरोधात ठाम भुमिका घेऊन वारंघुशी तलाठी कार्यालयाला गावकऱ्यांनी ग्रामसभेचा ठराव घेऊन टाळे ठोकण्यात आले आहे.या विशेष ग्रामसभेत अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे शेतीमालाचे नुकसान झाले असुन तलाठी पिचड त्यांच्या जवळच्या शेकऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांचेच पंचनामे केल्याचे तेथील ग्रामस्थांनी म्हटले आहे.विशेष ग्रामसभेत तलाठी रामदास पिचड हे ग्रामसभेला उपस्थित न राहिल्याने तेथील स्थानिकांच्या तक्रारी आल्याने तलाठी पिचड यांची बदली करा अन्यथा आम्ही तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करू असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.त्यामुळे तलाठी कार्यालयास ग्रामस्थांनी ठरावात नमूद केल्यानुसार टाळा ठोकण्यात आला असून प्रशासनाला पुढील कार्यवाही होई पर्यंत इशारा दिला आहे. यावेळी सरपंच फसाबाई बांडे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश कोरडे,दीपक भागडे, विलास कडाळी,कमल घाणे,सामाजिक कार्यकर्ते अजित कडाळी,तसेच ग्रामस्थ मारुती खाडे, देविदास भागडे,ज्ञानेश्वर खाडे,संदीप घाणे, नितीन लोटे यांसह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आईला व मुलीला कपड्याच्या कारणावरून मोठ्या प्रमाणात मारहाण

**शिवनेरी (स. गांवकरी) :** जुन्नर पोलीस स्टेशन येथे नंदा अनिल गवारी रा. बुचकेवाडी वैष्णवधाम ता. जुन्नर जि.पुणे हिने फिर्याद दिली की, सांय.६ वा. राहाते घरात अनिल शांताराम गवारी रा. गवारवाडी याने संशय घेवुन मी धुण्यासाठी काढलेले कपडे घराचे बाहेर नेवून पेटवण्यासाठी नेले. या असता कारणावरून कपाटाची फळी व पडद्याची स्टीलचे पाईप ने माझे डोक्यात पाठीत व हातावर मारहाण केली. माझ्या मुली भांडणे सोडविण्या साठी आल्या असता त्यानाही त्याने हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जबर दुखापत केली . आम्हाला जीवे मारण्याची धमकी दिली आहे . अनिल शांताराम गवारी रा. बुचकेवाडी यांच्या विरुध्द तक्रार आहे. यावरून रजि. नं. ३३७/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१),११५(२),३५२,३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पो .हवा. हिले पुढील तपास करीत आहेत.

### ५० वे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा-प्रदर्शन आणि परीक्षण



**मुंबई (स. गांवकरी) :** १९४९ पासून अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेल्या आणि वृत्तपत्र लेखन चळवळ यंदा ७६ वर्ष साजरे करीत आहे. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ५० वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने १९७६ पासून मराठी भाषेची वैभवशाली दिवाळी अंक प्रदर्शन परंपरा जपली जाते आहे. या उपक्रमात गोरेगाव येथील मराठी विचारधारा प्रतिष्ठान ही संस्था दरवर्षी प्रमाणे सहभागी होत आहे. या मान्यताप्राप्त आणि लोकप्रिय स्पर्धेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातूनही अंक येत असतात. सर्वोत्कृष्ट अंकासाठी मनोरंजनकार का र मित्र स्मृती पुरस्कार तर आवाजकार मधुकर पाटकर पुरस्कृत सर्वोत्कृष्ट विनोदी अंक, साने गुरुजी स्मृती सर्वोत्कृष्ट मुलांचा अंक, सर्वोत्कृष्ट धार्मिक अंक, मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित सर्वोत्कृष्ट अंक, कृष्णराव भानुसे स्मृती उत्कृष्ट दिवाळी अंक, पास्कोल लोबो पुरस्कृत गणेश केळकर स्मृती उत्कृष्ट अंक, मनोहरपंत चिवटे स्मृती सर्वोत्कृष्ट आरोग्य विषयक अंक यासह स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या अंकांचा उत्कृष्ट आणि उल्लेखनीय अंक म्हणून पारितोषिक देऊन मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी रोजी मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात येतो. स्पर्धा व प्रदर्शनासाठी आलेले हे अंक मुंबई-ठाणे शहरात प्रदर्शन आयोजित करून मांडले जातात. *सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यावर्षी "जागल्यांचा लोकजागर" या ब्लॉगवरून दिवाळी अंकांचे परीक्षण प्रसिद्ध करण्यात येणार आहे तसेच गेल्या ५० वर्षातील यावर्षापर्यंत प्रकाशित झालेल्या दिवाळी अंकांची संपर्क सूची मराठी भाषा दिवस साजरा करताना प्रकाशित करण्यात येणार आहे, हे अंक ग्रामीण भागातील शाळा-वाचनालयांना मोफत दिले जातात. दिवाळी अंकांच्या संपादक-प्रकाशकांनी २ प्रती - रवींद्र मालुसरे, अध्यक्ष-मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, घरकुल सोसायटी, रूम न. ६१२, ६ वा मजला, सेंच्युरी बाजार लेन, भुस्सा इंड. समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ आणि सुनील कुवरे ९१६७३६४८७० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## संघापासून दादा चार हात दूर : तळेगाव- दाभाडे नगर परिषदेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणे टाळले

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या नवीन इमारतीच्या उदघाटनाचा कार्यक्रम सोमवारी पार पडला. हा कार्यक्रम पुण्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार होता कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत तसा उल्लेख होता . परंतू, या इमारतीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक आणि प्रथम सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे नाव असल्यामुळे अजित पवार यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे टाळत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारधारा जपल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.



शिवसेनेत फुट पडल्यानंतर स्थापन झालेल्या भाजप शिवसेना सरकारमध्ये अजित पवार सहभागी झाले. पक्षाच्या विचारधारेशी कोणतीही तडजोड न करता विकासाच्या मुद्द्यावर महायुती सरकारमध्ये सामील झाल्याचे अजित पवार यांनी त्यावेळी स्पष्ट केले होते. महायुतीमध्ये अजित पवार भाजपसोबत आहेत. भाजप नेत्यासोबत ते सरकारच्या शासकीय कार्यक्रमात ते उपस्थित राहतात मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कुठल्याही व्यासपीठावर उपमुख्यमंत्री अजित पवार कधीच दिसत नाहीत, किंबहुना संघाशी संबंधीत कार्यक्रमाला देखील ते हजेरी लावत नाहीत हे मागील अडीच वर्षात अनेकदा दिसून आलेले आहे. नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान महायुतीच्या नेत्यांनी संघ मुख्यालयात भेट दिली. एकनाथ शिंदे यांनी देखील त्यावेळी संघ मुख्यालयाला भेट दिली होती. मात्र अजित पवार हे देखील उपस्थित राहिले नव्हते. त्यानंतर लोकसभा निवडणुकीनंतर देखील महायुतीच्या नेत्यांनी संघ मुख्यालयाला भेट दिली होती तेव्हा देखील अजित पवार यांनी संघ मुख्यालयात जाण्याचे टाळले.

सोमवारी तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या इमारतीचे ( डॉ. केशव ब. हेडगेवार भवन) उदघाटन झाले. या कार्यक्रमाच्या पत्रिकेवर अजित पवार यांचे प्रमुख उपस्थिती म्हणून नाव होते. मात्र असे असताना देखील हेडगेवार यांचे नाव इमारतीला असल्यामुळे पक्षीय विचारधारेच्या भूमिकेतून त्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहणे टाळले असल्याचे बोलले जात आहे, यामागे अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बहुजन सर्वसमावेशक विचारधारेच्या भूमिकेशी ठाम राहण्याची भूमिका असल्याचे मानले जाते.

राष्ट्रवादी काँग्रेससोबत दलित, बहुजन, अल्पसंख्यांक मतदार पक्ष स्थापनेपासून आहे. धर्म निरपेक्ष आणि सर्व समाजघटकांना सोबत घेऊन चालणारा पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ओळख आहे. त्यामुळे अजित पवार भाजपसोबत सत्तेत असले तरी संघापासून चार हात दूर असतात.

### बेरजेचे राजकारण परंतू विचारधारेशी तडजोड नाही

राष्ट्रवादी पक्ष फुटीनंतर यशवंतराव चव्हाण साहेबांचा फोटो बॅनरवर लावत यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांवर आम्ही वाटचाल करत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यांनतर पुसेसावळी दंगल, पन्हाळा दंगलीनंतर अजित पवार यांनी घटनास्थळी भेट दिली होती. अशा गोष्टीतून अजित पवार दलित-मुस्लिम समाजाला पक्षाच्या विचारधारेचा संदेश देत असतात. बेरजेचे राजकारण करायचे पण विचारधारेशी तडजोड करायची नाही अशी अजित पवार यांची भूमिका दिसते.

### अजित पवार मोजक्या नेत्यांपैकी एक

अजित पवार सत्तेत भाजपसोबत असले तरी संघापासून नेहमी दूर राहतात. पक्षाच्या विचारधारेत बहुजनवादाच्या भूमिकेला नेहमी वरचे स्थान ते देत असतात. भाजपसोबत सत्तेत जाऊन देखील आपल्या पक्षाच्या विचारधारेवर ठाम असणारे काही मोजके नेते आहेत. बिहारमध्ये नितीश कुमार हे देखील भाजपसोबत सत्तेत असले तरी संघापासून दूर असतात. त्याच पद्धतीने अजित पवार देखील संघापासून दूर राहण्याची भूमिका घेतात अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

## मंचरमध्ये लक्ष्मीपूजनानिमित्त शारदापूजन आणि वहीपूजन

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील व्यापारी बांधवांनी लक्ष्मी पूजननिमित्त शारदापूजन आणि वहीपूजन केले.लक्ष्मी पूजननिमित्त धनधान्य,सुखसमृद्धी लाभावी. यासाठी महालक्ष्मी,सरस्वती आणि महाकाली देवींचे पूजन करण्यात येते. मंचर ता.आंबेगाव येथील साई फर्निचरमध्ये अजय घुले,श्रीराम ज्वेलर्समध्ये गोरक्षनाथ कदम,निलेश कदम,निकेत कदम,शिंदे सेल्स कार्पोरेशन चे वैभव आणि गौरव दिलीप शिंदे,उत्तमभाग्य कलेक्शनमध्ये संदिप म्हसे,मंचर येथील होलसेल फॅशन फॅक्टरीमध्ये निखील गाडे पाटील,अवसरी खुर्द येथील शाहीनिती मसाले कारखान्यात मिलिंद खुडे,गावडेवाडी-डेरेआंबा येथे साई इंडस्ट्रीमध्ये संतोष गावडे,अंबिका इलेक्ट्रॉनिक्समध्ये हरसुख पोकार,एस सुपर शॉपीमध्ये मालक प्रवीण शिंदे यांच्या सह व्यापार्यांनी लक्ष्मीपूजन केले. लक्ष्मीपूजनाची माहिती देताना किशोर महाराज जोशी,हरेश महाराज जोशी म्हणाले,अश्विन महिन्यातील कृष्ण पक्ष अमावस्या हा दिवस तिसरे पर्व म्हणून ओळखला जातो.

## अवकाळीचा कहर द्राक्षाच्या बागांसह, भात शेतीचे प्रचंड नुकसान

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

मंगळवार दि:- २१ ऑक्टोबर रोजी दुपारी जुन्नर तालुक्यातील नारायणगाव परिसर,गोळेगाव परिसरासह आदिवासी भागात माघारी मान्सूनने अवकाळी उग्र रूप धारण करून प्रचंड मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे द्राक्षे बागा व आदिवासी भागात शेतकऱ्यांची हातातोंडाशी आलेली भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ते वाचविण्यासाठी शेतकरी राजाची तारांबळ झाली.

द्राक्ष बागेंची फळ छाटणी सप्टेंबर महिन्यात सुरु झाली असून,ज्या बागा फुटून आल्या आहेत त्या बागांमध्ये काडीवर



घड दिसून येत नाहीत.मे महिन्या पासून पडणारा सततचा पाऊस ज्यामुळे वेलिंना सूर्य प्रकाश न मिळाल्याने घड निर्मिती होऊ शकली नाही. तसेच बागांमध्ये पावसाचे पाणी साचून राहिल्याने मुळे सडून द्राक्ष वेली अशक्त राहिल्या आहेत आतापर्यंत जवळपास ८०% छाटण्या पूर्ण झाल्या असून,त्या बागांमध्ये काडीवर घड दिसून येत नाही. काडीवर फक्त वांज फुटच दिसत आहे. त्यामुळे द्राक्ष बगायतदार हवालदिल झाला असून तो खूप मोठ्या संकटात सापडला आहे .

तर जुन्नर तालुक्यातील पश्चिमेकडे आणि उत्तरेकडील कोपरे मांडवे मुथाळणे,जांभुळशी पुताचीवाडी,जोशीवाडी,यसनठा व,मारकुलवाडी,चिल्हेवाडी पाचघर,सातेवाडी,फोफसंडी या अत्यंत दुर्गम आणि आदिवासी भागातील भात शेती यंदा अतिशय उत्तम स्थितीत होती त्यामुळे बासमती व इंद्रायणी वाणांचा संपूर्ण शिवारात घम घमाट सुटला होता तो या आवकाळीच्या पावसाने तोंडचा हिसकावून नेला आहे.

प्रत्येक वर्षी येणाऱ्या नवनवीन संकटामुळे वातावरणा तील बदलामुळे मागील काही वर्षी प्रमाणेच यंदाचाही संपूर्ण द्राक्ष हंगाम वाया जाणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## ऋषिकेश-प्राजक्ता रानडे यांच्या बहारदार गायनाने श्रोते मंत्रमुग्ध

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

घन:शाम सुंदरा अरुणोदय झाला... गगन सदन तेजोमय... बगळ्यांची माळ फुले अजुनी अंबरात... पाहिले न मी तुला, तू मला न पाहिले... वेडात मराठे वीर दौडले सात... त्या तिथे पलिकडे माझिया प्रियेचे झोपडे... अशा एकापेक्षा एक सरस अजरामर गीतांनी दिवाळी पहाट रंगत गेली. श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद अन 'वन्स मोअर' ची फर्माईश दीपोत्सवाचा आनंद द्विगुणित करणारी ठरली.



निमित्त होते, मराठी माझा अभिमान असोसिएशनतर्फे विमाननगर येथील सिम्बायोसिसच्या सभागृहात आयोजित सुरमयी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे! प्रसिद्ध गायक ऋषिकेश रानडे आणि गायिका प्राजक्ता रानडे यांनी सुमधुर सादरीकरण, तर मिलिंद कुलकर्णी यांचे ओघवते निवेदन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पाठारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन संगीत मैफलीला प्रारंभ झाला.

प्रसंगी पूना गेस्ट हाऊसचे संचालक किशोर सरपोतदार, भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते अली दारूवाला, शहर उपाध्यक्ष अर्जुन जगताप, रामभाऊ दाभाडे, राहुल भंडारे, अनिल सातव, ओशन दरबार यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पारगाव (कारखाना) पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील पारगाव (कारखाना) पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने तब्बल ४ लाख ८० हजार किंमतीचे २५ गहाळ मोबाईल शोधून त्यांचे मुळ मालकांना परत दिल्याने पोलिसांची कामगिरी कौतुकास्पद ठरली आहे. पारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाजारपेठ व बसस्थानक परिसरातून मोबाईल हरवल्याच्या तक्रारींवर सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाने काम सुरू केले. पोलीस अंमलदार मंगेश अभंग व संजय साळवे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने हरवलेले मोबाईल ट्रॅक केले. उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या हस्ते हे मोबाईल फोन मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले.आपले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.ही कामगिरी पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## रोटरी क्लब अकोले सेंट्रल यांच्याकडून सुनिता बेणके यांना राष्ट्रबांधणीचे शिल्पकार पुरस्कार प्रदान

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या वतिने सन २०२५-२६ या वर्षाचे 'राष्ट्रबांधणीचे शिल्पकार' पुरस्कार रुंभोडी( मालुंजकर वस्ती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षिका तसेच सत्यनिकेतन संस्थेचे सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्राचार्य मधुकर मोखरे यांची सुविद्य पत्नी सुनिता देवराम बेनके(मोखरे) यांना नुकताच प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज बस स्थानक अकोले येथे रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या वतीने 'सांज दिपावली' हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी तालुक्याचे आमदार डॉ.किरण लहामटे



यांच्या शुभहस्ते शैक्षणीक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षक बंधुभगिनींना राष्ट्रबांधणीचे शिल्पकार पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. रोटरी क्लबच्या वतीने दरवर्षी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक बंधुभगिनिंना हा पुरस्कार दिला जातो.सुनिता बेनके(मोखरे) ह्या शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. अकोले तालुक्यासारख्या सर्वार्थाने आव्हानात्मक तालुक्यात संसाधनांनिशी विद्यार्थ्यांची ज्ञानाची भूक भागवण्याचे प्रामाणीक तसेच प्रवीत्र कार्य त्या करत आहेत. सध्या परवलीचा शब्द बनलेल्या तंत्रज्ञानाशी मैत्री करत आणि विद्यार्थ्यांनाही ती करायला लावत उद्याच्या भारताला गरज भासणारी अनं त्याच वेळ भारतीय संस्कृतीशी नाळ ठेवणारी एक तंत्रज्ञान स्नेही अशी सक्षम पिढी घडवण्याचे पवित्र कार्य सुनिता बेणके या करत आहेत. हे सार करताना त्यांनी समाजालाही बरोबर घेत चालल्या आहेत.मला किती येतय याच बरोबर मी समाजाला किती देते. मला एकटीला पुढे जायचे नाही,तर आपण सर्वांना पुढे जायचे आहे हे तत्व त्यांनी अंगिकारले.

त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून रोटरी क्लब अकोले सेंट्रल ३१३२ आपल्याला राष्ट्र बांधणीचे शिल्पकार पुरस्कार देवून गौरवण्यात आले.याप्रसंगी आमदार डॉ.किरण लहामटे,माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर, विद्याचंद्र सातपुते,ह.भ.प. दीपक महाराज देशमुख,प्राचार्य मधुकर मोखरे,रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल देशमुख,सचिव गंगाराम करवर, उपाध्यक्ष किरण गजे, सहसचिव विजय पावसे, खजिनदार सचिन आहेर यांसह तालुक्यातील शाळेचे शिक्षक,मुख्याध्यापक,तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

[रोटरी क्लब अकोले यांनी दिलेल्या पुरस्काराने निश्चितच प्रेरणा मिळाली. शिक्षण क्षेत्रात प्रामाणीकपणे कार्य केल्यास त्या चांगल्या कार्याचा निश्चितच गौरव होतो. शिक्षण क्षेत्रात ज्ञानदान सारखे दुसरे पवित्र क्षेत्र नाही.आयुष्याच्या प्रवासात जिद्द,संघर्ष,आणि आत्मविश्वास सदैव सोबत असतील तर यशापासून कोणीच रोखू शकत नाही.

**- सुनिता बेणके(मोखरे)**